
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**


प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ ठाण्यात खासगी बसगाडी चालकांकडून...

पान ३ वर....



■ तस्करी रोखण्यासाठी वाळूच्या बेकायदा उपशावर...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १९५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, १८ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# ईडीचे मुंबई, पुणे व दिल्लीत २१ ठिकाणी छापे

● मुंबई, यश सावंत :

टी-२० विश्वचषक सामन्यांचे बेकायदा प्रक्षेपण आणि ऑनलाईन सट्टेबाजीप्रकरणी सक्तवसुली संचलनलायाने (ईडी) मुंबई, पुणे व दिल्ली येथील २१ ठिकाणी छापे टाकले. मॅजिकविन प्रकरणी सुरू असलेल्या तपासात ही कारवाई करण्यात आली असून या कारवाईत बँक खात्यांमधील ३० लाख रुपये गोठवण्यात आल्याची माहिती ईडीकडून देण्यात आली. चित्रपट कलाकारांनी या सट्टेबाजी संकेतस्थळाची जाहितात केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.

गुजरातमधील अहमदाबाद येथील सायबर पोलीस ठाण्यात मॅजिकविन व इतरांविरोधात दाखल गुन्ह्यांच्या आधारे ईडी याप्रकरणी तपास करीत आहे. याबाबत ईडीने दिलेल्या माहितीनुसार, मॅजिकविन हे सट्टेबाजीचे एक संकेतस्थळ असून ते गेमिंगच्या नावाखाली चालवले जाते. ते संकेतस्थळ पाकिस्तानी नागरिकाच्या मालकीचे आहे. हे संकेतस्थळ दुबईत काम करणारे किंवा स्थायिक झालेले भारतीय नागरिक चालवत आहेत. फिलिपिन्समध्ये सट्टेबाजी कायदेशीर




आहे. त्यामुळे या संकेतस्थळावर दाखवले जाणारे सट्टेबाजीचे खेळ फिलिपिन्समधून चालवले जात आहेत. त्याच्या आडून या संकेतस्थळावरून खेळांचे बेकायदा प्रक्षेपणही केले जाते. या संकेतस्थळावरील सट्टेबाजी, संबंधित रक्कम, बेटिंग लावणे आणि पैसे काढण्याचे नियंत्रण मात्र मॅजिकवीनच्या मालकांकडे असल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

खेळाडू किंवा बेटिंग करणाऱ्यांनी संकेतस्थळावर दाखवलेल्या बँक खात्यात जमा केलेले पैसे विविध बनावट बँक खात्यांद्वारे वळवण्यात आले. त्यातून नफा झालेली रक्कम (कूट चलनात) क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवण्यासाठी, रोख स्वरूपात काढण्यात अथवा हवाला मार्गाने दुबईला पाठवण्यात आली. तसेच, खेळाडू किंवा बेटिंग करणाऱ्यांना जिंकलेली रक्कम त्याच्या बँक खात्यात बनावट कंपन्यांच्या खात्यांमार्फत आणि पेमेंट गेटवेच्या मदतीने हस्तांतरित केली जाते. काही रक्कम डोमेस्टिक मनी ट्रान्सफरच्या (डीएमटी) माध्यमातूनही जिंकलेल्यांच्या खात्यांमध्ये पाठवली जाते.

मॅजिकविनने भारतात एका भव्य लॉन्च पार्टीचे आयोजन केले होते. तेथे अनेक बॉलिवूड कलाकार उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी मॅजिकविनची जाहिरात केली. या कालाकारांची संकेतस्थळासाठी छायाचित्रे काढण्यात आली. तसेच जाहिरातीचे चित्रीकरणही करण्यात आले. या कलाकारांनी छायाचित्र व चित्रफीती आपल्या समाज माध्यमांवर पोस्ट केले. विविध भागांमध्ये जाहिरात फलकही लावण्यात आले होते. विशेषतः गुजरात आणि महाराष्ट्रातात असे फलक लावण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. सट्टेबाजी संकेतस्थळाद्वारे जमा झालेल्या एकूण ठेवींतील ५० टक्क्यांहून अधिक रक्कम नफा स्वरूपात मिळत आहे.

पान २ वर

## वाह रे, दादाचा वादा, कसला वादा अन् कसला दादा

### छगन भुजबळांचा अजित पवारांवर संताप

● येवला, सचिन कदम :



राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी मंत्री छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात संधी मिळणार अशी चर्चा असतानाच त्यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आले. यामुळे छगन भुजबळ कमालीचे नाराज झाले असून नागपूरचे हिवाळी अधिवेशन सोडून ते नाशिकमध्ये दाखल झाले. यानंतर आज छगन भुजबळ यांनी येवल्यातील कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी वाह रे, दादाचा वादा, कसला वादा अन् कसला दादा, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय. तर आपल्या समर्थकांसमोर त्यांनी आपल्या कार्याचा लेखाजोखाच मांडला आहे. येवल्यातील कार्यकर्त्यांशी संवाद साधताना छगन भुजबळ म्हणाले की, तुम्हा सर्वांचे मन:पूर्वक आभार.

पान २ वर

## () थोडक्यात ()



### विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक १९ डिसेंबरला

**नागपूर :** मागील २ वर्षांपासून रिक्त असलेल्या विधानपरिषदेच्या सभापती पदाची निवडणूक दि. १९ डिसेंबर रोजी घेण्यात येणार असल्याची घोषणा विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मंगळवार, दि. १७ डिसेंबर रोजी केली. माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांची मुदत ऑगस्ट २०२२ मध्ये संपुष्टात आल्यापासून विधान परिषदेचे सभापती पद रिक्त आहे. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात संख्याबळाअभावी त्यांनी निवडणूक टाळली होती. आता महायुतीकडे पुरेसे संख्याबळ असल्यामुळे त्यांचा सभापती विराजमान होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विधान परिषदेत सध्या भाजपकडे सर्वाधिक ३० आमदार असल्यामुळे या पक्षाचाच सभापती होईल, अशी चर्चा आहे.

### कळंबोली आणि खांदेश्वरमध्ये १७ लाख रुपयांची विजचोरी




**पनवेल :** खांदेश्वर वसाहतीमध्ये आणि कळंबोली गावामध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी विजचोरी केल्यामुळे वीज महावितरण कंपनीने दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये विज चोरी केलेल्या व्यक्तींविरोधात गुन्हे नोंदविले आहेत. खांदेश्वर वसाहतीमधील सेक्टर ११ येथील मंगलमूर्ती टॉवरमधील एका वीज ग्राहकाने ७१,६९९ युनिट वीजेची चोरी केल्याचे वीज महावितरण कंपनीचे अभियंत्यांच्या तपासणीमध्ये आढळल्याने तब्बल १५ लाख २३ हजार ५१० रुपयांचे विजेचे देयक न भरल्याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात वीज ग्राहकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.तसेच कळंबोली गावातील एका वीज ग्राहकाने मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यापासून ते या वर्षी सप्टेंबर महिन्यापर्यंत ७,४२८ वीज युनीटची चोरी केल्याने वीज महावितरण कंपनीने या विज ग्राहकाविरोधात २ लाख ५५ हजार ३७० रुपयांची विज चोरी केल्यामुळे कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

## मी रामदास आठवलेंची माफी मागतो, चंद्रशेखर बावनकुळेंकडून जाहीर माफीनामा

● पुणे, अभिजित येरल्लू :

भाजप नेते आणि महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची माफी मागितली आहे. "मी रामदास आठवले यांची माफी मागतो. त्यांना गडबडीत मंत्रिमंडळ विस्ताराचे निमंत्रण वेळेत पोहचले नाही. आमच्याकडून चुक झाली आहे", असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. ते पुण्यात बोलत होते.



चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मंत्रिमंडळात कोणाला घ्यायचे कोणाला नाही हा मुख्यमंत्र्यांचा निर्णय आहे. छगन भुजबळ यांना भविष्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुती चांगले स्थान देईल. सुधीर मुनगंटीवार आणि इतरांची मंत्रीपदावरुन कोणतीही नाराजी नाही. राष्ट्रवादी आणि शिवसेना त्यांच्या पक्षातील नाराजांची नक्कीच समजूत काढतील. घराणेशाहीचा आरोप योग्य नाही.

## परभणीतील हिंसाचारप्रकरणी ४० जणांना अटक

● परभणी, दिगंबर जाधव :

शहरांतील संविधानाच्या पुस्तिकेच्या शिल्पाची विटंबना केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. तसेच, विटंबना करणाऱ्याला जमावाने ताब्यात घेऊन चोप दिला होता. तर, पोलिसांनीही त्याला अटक करून गुन्हा दाखल केलेला. त्यामुळे, काल सर्वांनी एकत्र येवून शांततेत बंद करणार असल्याचं प्रशासनाला कळवलं होतं. मात्र , तसं झालं नाही, आज आंदोलनादरम्यन मोठी हिंसा



झाली. ज्या काही लोकांनी हिंसा केलेली आहे, अशा आतापर्यंत ४० जणांना आम्ही ताब्यात घेतले असून पोलीस नियमानुसार कारवाई करणार असल्याची माहिती नांदेड परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिली आहे. परभणीतील हिंसाचाराच्या घटनेनंतर शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे, जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये शहरात जमावबंदीचे आदेश जारी करण्यात आले होते. तर, मोठा पोलीस फौजफाटाही रस्त्यावर तैनात असल्याचं पाहायला मिळालं.

परभणी शहरात आज झालेल्या आंदोलनावेळी अनेक ठिकाणी तोडफोड आणि वाहनांचे टायर जाळले, जिल्हाधिकारी कार्यालयात खुर्च्यांची फेकाफेकी केली, या घटनेमुळे पोलिसांकडून बळाचा वापर करण्यात आला. याप्रकरणी, घटनेसाठी जबाबदार असलेल्या ४० लोकांना ताब्यात घेण्यात आलं असून वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती शहाजी उमाप यांनी दिली. परभणी शहरात सध्या जमावबंदी आहे.

पान २ वर

### महामेट्रो आणि आशियाई विकास बँक यांच्यात प्रकल्प करार

## नागपूर मेट्रो प्रकल्प टप्पा-२ ला चालना मिळाल्यामुळे नागपूर शहरासह परिसराचा अधिक गतीने विकास होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● नागपूर, नितीन देवळेकर :

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून १ हजार ५२७ कोटी रुपयांचे (२०० मिलियन डॉलर) अर्थसहाय्य मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी स यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात यासंदर्भात प्रकल्प करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळणार असल्याचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि आशियाई विकास बँकेच्या संचालक मिओ ओका यांनी अर्थसहाय्याच्या करारावर सह्या केल्या.

## नगर भूमापन अधिकाऱ्याविरुध्द १० लाखाची लाच मागितल्याने गुन्हा

● धुळे, सचिन कदम :

भूखंडाचा पोटहिस्सा मोजणी करून सर्व सहधारकांच्या नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करून देण्यासाठी १० लाख रुपयांची लाच मागितल्याने नाशिक येथील नगर भूमापन अधिकाऱ्यासह एका खासगी व्यक्तीविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल केला आहे.



तक्रारदार आणि इतर सहधारक यांच्या नावे मालेगाव येथील इस्लामपुरा येथे एक भूखंड आहे. या भूखंडाची पोटहिस्सा मोजणी करून सर्व सहधारकांचे नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करून द्यावी, अशी विनंती तक्रारदाराने केली होती. हे काम करून देण्यासाठी नाशिकचे भूमापन अधिकारी (वर्ग-२) पंढरीनाथ चौधरी (५०,रा. राजकमल रो हाऊस, ओमकार नंगर, पेठरोड, नाशिक) यांनी २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी १० लाख रुपयांची लाच मागितली. यामुळे संबंधितांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. या तक्रारीची अधिकाऱ्यांनी पडताळणी केली असता पंढरीनाथ चौधरीने १० लाख रुपयांची लाच मागितल्याचे प्रथमदर्शी निदर्शनास आले. खासगी व्यक्ती अन्सारी मेहमूद शफी ७२, रा. मालेगाव) याने ही लाच रक्कम देण्यास प्रोत्साहित केल्याचेही प्राथमिक पडताळणीत उघड झाले.

पान २ वर

## मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर आमदार निरंजन डावखरे यांची नियुक्ती

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) भाजपचे आमदार निरंजन वसंत डावखरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे प्रतिनिधी म्हणून आमदार डावखरे यांना नामनिर्देशित करण्यात आले आहे. विधिमंडळातील तरुण चेहरा म्हणून आमदार निरंजन डावखरे यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातून त्यांची २०१२ मध्ये पहिल्यांदा विधान परिषदेवर निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी विधान परिषद निवडणुकीत हॅट्रिक नोंदविली. गेल्या १२ वर्षांच्या काळात त्यांनी विधान परिषदेत शैक्षणिक, सामाजिक आणि नागरी समस्यांकडे सातत्याने लक्ष वेधले. तसेच ते सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. राज्यातील शिक्षकांचे प्रश्नही त्यांनी हिरीरीने मांडले. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या मांडल्या असून, `एमपीएससी'साठी बेलापूर येथे



स्वतंत्र मुख्यालय मंजूर करुन घेतले. कोकणातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी सर्व शाळा डिजिटल करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यानुसार आतापर्यंत कोकणातील शेकडो शाळांना संगणकासह विविध साहित्यपुरवठा करण्यात आला. मुंबई विद्यापीठाच्या कक्षेत कोकणातील पाच जिल्ह्यातील महाविद्यालये आहेत. त्याचबरोबर काही शहरात विद्यापीठाची उपकेंद्रे आहेत. मुंबई विद्यापीठ प्रशासन आणि महाविद्यालयातील समन्वय, तसेच उपकेंद्रात नवे अभ्यासक्रम आणि प्रशासकीय सुधारणा आदी करण्यामध्ये आमदार निरंजन डावखरे यांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे.

## 'एक देश एक निवडणूक' हे होता कामा नये : उद्धव ठाकरे

● नागपूर, नितीन देवळेकर :



केंद्रातील मोदी सरकारने 'एक देश, एक निवडणूक' या विधेयकाला गुरुवार, दि. १२ डिसेंबर रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली. त्यानंतर मंगळवार, दि. १७ डिसेंबर रोजी 'एक देश एक निवडणूक' विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले असून त्यावर मतदान घेण्यात येणार आहे. 'एक देश एक निवडणूक' विधेयकाला लोकसभेत काँग्रेस सहीत इंडी आघाडीने विरोध दर्शवल्याचे समोर आले आहे. अशातच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मंगळवार, दि. १७ डिसेंबर रोजी पत्रकार परिषद झाली. एक देश एक निवडणूक याबद्दल त्यांनाही प्रश्न विचारण्यात आला असता, त्यांनी स्पष्ट मत मांडत विरोध दर्शवला.

अदानींचा मुद्दा असो किंवा देशातले आणखी काही महत्वाचे विषय असोत, त्यावरून लक्ष भरकटवण्यासाठी किंवा दिशाभूल करण्यासाठी वन नेशन वन इलेक्शन हा विषय आणला जात आहे. वन नेशन वन इलेक्शनच्या आधी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक झाली पाहिजे. माझं तर असं स्पष्ट मत आहे की निवडणूक आयुक्त हे देखील निवडणुकीतून निवडले गेले पाहिजेत. नियुक्ती करुन नेमण्यात आलेले निवडणूक आयुक्त जर आम्हाला निवडणुकीचे कायदे शिकवणार असतील तर ती प्रथा योग्य नाही. अशा व्यक्तीच्या अधिपत्याखाली वन नेशन वन इलेक्शन होता कामा नये. निवडणूक आयुक्तसुद्धा निवडून आला पाहिजे. तरच त्याला निवडणूक आयुक्त मानलं पाहिजे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

मतदानाची प्रक्रिया ही पारदर्शक असली पाहिजे. त्याशिवाय वन नेशन वन इलेक्शन अर्थात एक देश एक निवडणूक हे होता कामा नये, अशी ठाम भूमिका उबाठाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी मांडली. या (विधानसभा) निवडणुकीत राज्यात जे झालं ते महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला पटलेलं नाही, आणि हे पटलेलं नसताना त्यांच्या डोक्यावर अशा पद्धतीने निवडणुका लादू शकत नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

## संपादकीय

# हिताचे आणि हक्कांचे रक्षण

जागतिक आरोग्य संघटनेच्या व्याख्येनुसार मानसिक आरोग्यामध्ये भावनिक, मनोवैज्ञानिक आणि सामाजिक कल्याण यांचा समावेश होतो, ज्याचा आकलनशक्ती, धारणा आणि वर्तन यांवर परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटने (डब्ल्यूएचओ) च्या मते, ही एक 'कल्याणाची स्थिती आहे ज्यामध्ये व्यक्तीला तिच्या क्षमतांची जाणीव होते. ती तिच्या जीवनातील सामान्य ताणतणावांचा सामना करू शकते. उत्पादक आणि फलदायीपणे कार्य करू शकते आणि तिचा समुदाय, तसेच व्यक्तिगत पातळीवर एखादी व्यक्ती तणाव, परस्पर संबंध आणि निर्णय घेण्याची क्षमता कशी हाताळते हे देखील ते ठरवते.

भारतामध्ये मानसिक आरोग्य धोरण आणि कायद्याचा प्रवास हा टप्प्याटप्प्याने प्रगती करत आलेला आहे. या प्रवासाची सुरुवात १९ व्या शतकात झाली, जेव्हा ब्रिटीश कालखंडात काही मानसिक आरोग्य संस्थांची स्थापना झाली. १८९७ साली लागू झालेला इंडियन लुनासी ॲक्ट हा कायदा मानसिक रुग्णांसाठी प्रथमच व्यवस्थात्मक दृष्टीकोन मांडणारा कायदा होता. मात्र, हा कायदा आजच्या दृष्टिकोनातून मागासलेला आणि अपुरा वाटतो. मात्र, त्या काळातील मानसिक आरोग्य व्यवस्थापन हे रुग्णांना वेगळे ठेवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करत होते. हा कायदा रुग्णांना 'लूनाटिक' म्हणजेच वेडसर म्हणून वर्गीकृत करत असे. यामध्ये रुग्णांच्या कल्याणापेक्षा नियंत्रणाला प्राधान्य होते. या कायद्याचा उद्देश हा मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना ओळखणे आणि त्यांना वेगळे ठेवण्यासाठी नियामक व्यवस्था तयार करणे हा होता. तसेच मानसिक रुग्णांसाठी आश्रयगृहांची स्थापना करणे आणि त्यांचे प्रशासन ठरवणे आणि मानसिक आजारग्रस्त व्यक्तींवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांना समाजापासून विलग करणे हा होता. या कायद्याचा परिणाम असा झाला की मानसिक आरोग्यासाठी मूलभूत वैधानिक चौकट उपलब्ध झाली, परंतु ती मुख्यतः संस्थात्मक नियंत्रणावर आधारित होती. मानसिक आरोग्यासंबंधी कलंक आणि नकारात्मकता वाढीस लागली. तसेच उपचारांची मर्यादा, पायाभूत सुविधा, आणि रुग्णांचे अधिकार याकडे दुर्लक्ष झाले. भारतातील मानसिक आरोग्य क्षेत्राच्या ऐतिहासिक प्रवासाचा हा कायदा एक महत्त्वाचा टप्पा मानला जाऊ शकतो, जो मानसिक आरोग्याच्या सध्याच्या प्रगत धोरणांसाठी शिकवण ठरला आहे. १८९७ चा इंडियन लुनासी ॲक्ट हा काळाच्या संदर्भात मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी पहिला टप्पा ठरला असला, तरी तो उपचारांपेक्षा विलगीकरणावर आधारित होता. हा कायदा मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी योग्य दिशादर्शक ठरला नाही. यावर आधारित अनुभव आणि चुका लक्षात घेऊन पुढे १९८७ आणि २०१७ चे कायदे अधिक सुस्पष्ट आणि मानवतावादी दृष्टिकोनात तयार करण्यात आले. १९८७ चा मानसिक आरोग्य कायदा १९८७ चा मेंटल हेल्थ ॲक्ट हा भारतात मानसिक आरोग्यासाठी लागू केलेला पहिला व्यापक कायदा होता. या कायद्याचा उद्देश मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना त्यांच्या उपचारांसाठी योग्य सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे हा होता. याने १८९७ च्या इंडियन लुनासी ॲक्टची जागा घेतली, जो रुग्णांच्या हक्कांपेक्षा नियंत्रणावर अधिक भर देत असे. या कायद्यात मानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या उपचारांसाठी सुधारित आणि अधिक मानवीय दृष्टीकोन प्रदान करण्यात आला. तसेच मानसिक आरोग्य संस्थांमध्ये रुग्णांच्या प्रवेश, उपचार, आणि सुटकेसाठी निश्चित प्रक्रिया तयार करण्यात आली. य कायद्याद्वारे मानसिक रुग्णांचे हक्क संरक्षित करण्यात आले आणि त्यांचे व्यक्तीचे कुठलाही प्रकारे शोषण होणार नाही याची उपाययोजना करण्यात आली. मानसिक रुग्णांना मानवी हक्क मिळावेत, यावर

# अल्पसंख्याकांची परवड होता कामा नये!



प्रविण बागडे

अल्पसंख्याक लोकांना पुढे आणण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हा दरवर्षी १८ डिसेंबर रोजी ‘अल्पसंख्याक हक्क दिन’ म्हणून देशात साजरा केला जातो. मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी आणि जैन हे भारतातील अल्पसंख्याकांमध्ये गणले जातात. यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. भारतीय राज्यघटनेनुसार देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळाले पाहिजेत, मग ती कोणतीही जात, धर्म, भाषा किंवा समुदाय असो. देशाच्या संविधानात अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची तरतूदही आहे. संविधानातील तरतूदीनुसार व कायदेशीरप्रमाणे भारतामध्ये धार्मिक अल्पसंख्याक आणि भाषिक अल्पसंख्याक असे दोन प्रकारचे अल्पसंख्याक समुदाय आहेत. भारतामध्ये राहणाऱ्या व त्यांची वेगळी भाषा व लिपी असणाऱ्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक म्हणून गणण्यात येते तर राज्यामध्ये राज्यभाषेव्यतिरिक्त इतर भाषा मातृभाषा असलेल्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक म्हणून गणण्यात येते.

महाराष्ट्रामध्ये मराठी व्यतिरिक्त अन्य भाषा मातृभाषा असणाऱ्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक गणण्यात येते. केंद्रीय गृहमंत्रालयाने १९७८ मध्ये एक ठराव पारीत केला, ज्यामध्ये अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी एक आयोग स्थापन करण्याचे सांगण्यात आले. त्यासोबतच भारतीय संविधानात संरक्षणाचे अनेक कायदे असल्याचेही सांगण्यात आले, असे असूनही अल्पसंख्याकांना असुरक्षित वाटत आहे. एवढेच नाही तर त्यांच्याशी भेदभाव केला जातो, हे संपवण्यासाठी अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आली. यासोबतच १९९२ मध्ये ‘राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगा’ने कायदा केला. ज्याअंतर्गत १९९३ ची अधिसूचना आली. ते लोक अल्पसंख्याक समाजात येतात, जे आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेले आहेत. याशिवाय ज्यांची लोकसंख्याही कमी आहे. त्यांची भाषा, धर्म, परंपरा सर्वसामान्य समाजातील लोकांपेक्षा वेगळी असावी. मात्र शेजारील देशातील अल्पसंख्याक निर्वासितांना नागरिकत्व देण्याच्या कायद्याला विरोध करत सर्वोच्च न्यायालयाने नवा निर्णय देत अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांची व्याख्या स्पष्ट केली आहे.

हा निकाल देताना न्यायालयाने म्हटले की, धर्माला मर्यादा नाही. धर्माकडे राज्याच्या दृष्टीने न पाहता अखिल भारतीय पातळीवर पाहिले पाहिजे. ‘अल्पसंख्याक’ हा शब्द प्रामुख्याने राष्ट्रीय कायदेमंडळातील राजकीय पक्षांना संदर्भित केला जात असे, वांशिक, राष्ट्रीय, भाषिक किंवा धार्मिक गटांना नाही. पॅरिस परिषदेचे श्रेय अल्पसंख्याकांच्या हक्कांची संकल्पना मांडण्यात आले आणि त्याला महत्त्व दिले गेले. १८१४ मध्ये व्हिएन्नाच्या काँग्रेस मध्ये अल्पसंख्याकांच्या हक्कांचा मुद्दा प्रथम उपस्थित करण्यात आला होता, ज्यामध्ये जर्मन ज्यू आणि विशेषत: पुन्हा एकदा फाळणी झालेल्या ध्रुवांच्या भवितव्यावर चर्चा करण्यात आली होती. काँग्रेसने आशा व्यक्त केली की प्रशिया, रशिया आणि ऑस्ट्रिया त्यांच्या अल्पसंख्याकांना सहिष्णुता आणि संरक्षण देतील, ज्यांचा शेवटी त्यांनी दुर्लक्ष केले, संघटित भेदभावात गुंतले. हंगेरीच्या क्रांतिकारी संसदेने जुलै १८४९ मध्ये प्रथम अल्पसंख्याक हक्कांची घोषणा करुन ती अंमलात आणली. त्यानंतर १८६७ मध्ये ऑस्ट्रियन कायद्यात अल्पसंख्याक हक्क संहिताबद्ध करण्यात आले.

तथापि रशियन सरकारने आपल्या खेड्यांमध्ये ज्यूंविरुद्ध होणारे दुष्ट पोग्रोम सहन केले. या धोरणासाठी रशियावर मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले. याउलट आफ्रिकन वसाहती स्वतंत्र झाल्यापासून दक्षिण युनायटेड राज्यामधील कृष्णवर्णीय लोकांसारख्या इतर अल्पसंख्यांकांच्या वागणुकीबाबत फार कमी किंवा कोणताही आंतरराष्ट्रीय आक्रोश नव्हता.

पहिल्या महायुध्दापूर्वी फक्त तीन युरोपीय देशांनी वांशिक अल्पसंख्याकांचे हक्क घोषित केले आणि अल्पसंख्याक-संरक्षणात्मक कायदे लागू केले. पहिला हंगेरी (१८४९ आणि १८६८), दुसरा ऑस्ट्रिया (१८६७) आणि तिसरा बेल्जियम (१८९८) होता. पूर्वीच्या काळात इतर युरोपीय देशांच्या कायदेशीर प्रणालींनी प्राथमिक शाळांमध्ये, सांस्कृतिक संस्थांमध्ये, सार्वजनिक प्रशासनाच्या कार्यालयांमध्ये आणि कायदेशीर न्यायालयांमध्ये युरोपियन अल्पसंख्याक भाषा वापरण्यास परवानगी दिली नाही. भाजप नेते अश्वनी कुमार यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. यामध्ये जम्मू-काश्मीर आणि ईशान्येकडील राज्यांसह एकूण ८ राज्यांमध्ये हिंदू समाजाच्या लोकांची लोकसंख्या कमी असल्याचे सांगण्यात आले. यामुळे त्यांना अल्पसंख्याकांच्या श्रेणीत ठेवण्यात आले आहे. अशा स्थितीत ना त्यांना सरकारी सुविधा मिळू शकल्या, ना त्यांचे हक्क मिळू शकले. याशिवाय असे विचार टाळायचे असतील तर, या प्रकरणांची न्यायालयातही सुनावणी झाली पाहिजे, असे याचिकेत म्हटले आहे. अल्पसंख्याक हे धर्म, भाषा, राष्ट्रीयत्व किंवा जात यावर आधारित असतात. तेव्हा संयुक्त राष्ट्राने म्हटले की, अल्पसंख्याकांची संस्कृती, धर्म इत्यादींच्या रक्षणासाठी देशांना पावले उचलावी लागतील, जेणेकरून त्यांचे अस्तित्व धोक्यात येऊ नये. म्हणुन संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १९९२ मध्ये या दिवसासाठी १८ डिसेंबर निवडला होता. संयुक्त राष्ट्राने उचललेले हे मोठे पाऊल होते. विशेषतः भारताच्या दृष्टिकोनातून, हे लक्षात घेऊन भारतात अल्पसंख्याक आयोगाची निर्मिती करण्यात आली. हा आयोग अल्पसंख्याक लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पावले उचलतो आणि बहुसंख्य लोकांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो. राष्ट्रीय अल्पसंख्याकांच्या संरक्षणाच्या क्षेत्रात युरोपियन युनियनची थेट भूमिका अजूनही खूप मर्यादित आहे. सामान्य आंतरराष्ट्रीय कायदे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या युरोपीय प्रादेशिक प्रणालीवर अवलंबून आहे आणि आवश्यकतेनुसार त्यांचे मानदंड स्वीकारले. पण १९९० च्या दशकात सुरू झालेल्या ‘युरोपियन एकात्मतेचे डी-इर्कोनॉमायझेशन’ ही परिस्थिती बदलत आहे. राष्ट्रीय अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची राजकीय प्रासंगिकता खूप जास्त आहे. ‘अल्पसंख्याक हक्क दिना’निमित्त सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

## पान १ वरून...

### ईडीचे मुंबई, पुणे व दिल्लीत २१...

ईडीने याप्रकरणी आतापर्यंत ६८ ठिकाणी छापे टाकले आणि महत्त्वाची कागदपत्रे, तसेच डिजिटल उपकरणे जप्त केली. आतापर्यंत या प्रकरणात एकूण तीन कोटी ५५ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याचे ईडीकडून सांगण्यात आले.ईडीने १० आणि १२ डिसेंबर रोजी ही कारवाई केली.

### वाह रे, दादाचा वादा, कसला...

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत येवला-लासलगावचा किल्ला आपण लढवला, तुमचे आभार. भुजबळ साहेब निवडून येणार नाहीत, असे आमच्या राष्ट्रवादीत बोलणे चालले होते. सर्व जाती धर्मांचे लोक माझ्यासोबत होते. विशेष करून मराठा समाजाचे आभार. या निवडणुकीत मी मोठ्या संख्येने निवडून आलो. देशात जो प्रयोग झाला नाही तो प्रयोग आपण येवल्यात घडवला. १६० किलोमिटर लांबून पाणी आणलं. मला मते देतील असे वाटत होते. मात्र काही मंडळी चक्करमध्ये पडली. मला कोणाबद्दल अजिबात राग नाही. पाण्याचा प्रकल्प अजून पूर्ण झाला नाही, तो पूर्ण करायचा आहे. ज्यांनी मते दिली नाही त्यांनाही अजून जास्त पाणी द्यायचे आहे, तालुक्याच्या विकासासाठी सगळ्यांना सोबत घ्यायचे आहे. आपल्याला एकत्रित काम करायचे आहे. नगर परिषद, जिल्हा, पंचायत समिती यात आपण आपली ताकद दाखवून देणार आहे, असे त्यांनी म्हटले.

झाला आहे. त्यामुळे वहिनीला राज्यसभेवर पाठवले. साताराची जागा आम्ही भाजपला सोडली. त्याबदल्यात पियूष गोयल यांची जागा आम्हाला मिळणार होती. मकरंद पाटील यांच्या भावाची जागा मला द्या. मात्र मी शब्द दिला आहे असे मला सांगितले. सगळ्यांच्या चर्चा होतात मग आपल्या का नाही? त्यानंतर मग मी येवल्यात येवून आमदारकी लढवली, असेही त्यांनी म्हटले.

कसला वादा, अन् कसला दादा

आठ दिवसांपूर्वी समीर भुजबळांना पटेल, तटकरे यांनी बोलवले. नितीन पाटील यांचा राजीनामा घेवून भुजबळ साहेबांना राज्यसभेवर पाठवू, असे सांगितले. मकरंद पाटील यास मंत्रिपद द्यायचे अन् त्याच्या भावाला खाली बोलवायचे. हा काय पोरखेळ आहे का? लोकांनी मला निवडून दिले, त्यांना मी काय तोंड काय देवू. त्यांना भुजबळांचा बळी घ्यायचा होता का? छगन भुजबळ काय लल्लू पाटील आहे का? हा काही पोरखेळ आहे का? माझ्या मनात मंत्री पदाची शंका होती, अन् त्याप्रमाणे झाले. माझी जर किंमत होत नसेल तर काय उपयोग? दादाचा वादा. वाह रे दादाचा वादा, कसला वादा, अन् कसला दादा, असे म्हणत छगन भुजबळ यांनी संताप व्यक्त केलाय.

मी पुन्हा उभा राहील

ते पुढे म्हणाले की, हा लढा मंत्रीपदाचा नाही, तर अस्मितेचा आहे, लढा अपमानाचा आहे. मी पुन्हा उभा राहील, लोकशाही आहे. पटेल, तटकरे यांचे कॉल पण ते ऐकत नसल्याचे सांगितले. फडणवीस देखील अजित पवारांना बोलले, भुजबळांना मंत्री करा. पण त्यांनी ऐकले नाही. सरकारी पक्षात असल्याने बोलता येत नाही. जे झाले ते लोकांच्या कानावर टाकणे गरजेचे आहे. विविध पक्षातील लोक नाराज झाले, पण दादांचा वादा महत्त्वाचा आहे.

येथे एक भूखंड आहे. या भूखंडाची पोटहिस्सा मोजणी करून सर्व सहधारकांचे नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करून द्यावी, अशी विनंती तक्रारदाराने केली होती. हे काम करून देण्यासाठी नाशिकचे भूमापन अधिकारी (वर्ग-२) पंढरीनाथ चौधरी (५०,रा. राजकमल रो हाऊस, ओमकार नंगर, पेठरोड, नाशिक) यांनी २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी १० लाख रुपयांची लाच मागितली. यामुळे संबंधितांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. या तक्रारीची अधिकाऱ्यांनी पडताळणी केली असता पंढरीनाथ चौधरीने १० लाख रुपयांची लाच मागितल्याचे प्रथमदर्शी निदर्शनास आले. खासगी व्यक्ती अन्सारी मेहमूद शफी ७२, रा. मालेगाव) याने ही लाच रक्कम देण्यास प्रोत्साहित केल्याचेही प्राथमिक पडताळणीत उघड झाले.

यामुळे दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासी अधिकारी सचिन साळुंखे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे नाशिक परीक्षेत्राच्या अधीक्षका शर्मिष्ठा घारगे-वालावलकर आणि धुळे येथील उपअधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा पथकातील राजन कदम, सुधीर मोरे, रामदास बारेला यांच्या मदतीने ही कारवाई केली. मालेगाव कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही खासगी व्यक्तीने त्यांचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी, किंवा न करण्यासाठी अथवा ते काम करून दिल्याचे मोबदल्यात लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे, येथे ०२५६२२३४०२० किंवा टोल फ्री क्रमांक-१०६४ यावर

# ठाण्यात खासगी बसगाडी चालकांकडून परिवहनच्या थांब्यांवरून प्रवाशांची पळवापळवी

ठाणे (रोहित जैसवाल) : ठाणे महापालिका परिवहन उपक्रमातील बसगाड्यांबरोबरच नवी मुंबई परिवहन सेवा आणि बेस्ट बसगाड्यांची ठाणे शहरातून वाहतूक होत असली तरी, बेकायदा प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसगाडी चालकांकडून परिवहनच्या थांब्यांवरून प्रवाशांची पळवापळवी करताना दिसून येत आहे. त्याची फटका बेस्ट, ठाणे आणि नवी मुंबई परिवहन उपक्रमांना बसून त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. त्यावर फारशी कारवाई होताना दिसून येत नाही.

ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २७ लाखांच्या घरात गेली आहे. येथील प्रवाशांना महापालिका टिएमटीच्या माध्यमातून सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध करून देते. ना नफा ना तोटा तत्वावर परिवहन उपक्रम चालविण्यात येतो. टिएमटीच्या ताफ्यात ४७४ बसगाड्या आहेत. परंतु प्रवाशांच्या मानाने टिएमटीच्या ताफ्यात पुरेशा बसगाड्या नाहीत. यामुळे टिएमटीकडून बसगाड्यांच्या संख्येत वाढ करण्यावर भर देण्यात येत आहे. सुरुवातीला परिवहन उपक्रमाच्या बसगाड्यांची वाहतूक शहरापुरतीच मर्यादीत होती. परंतु राज्याच्या परिवहन विभागाने बसगाड्यांची वाहतूक दुसऱ्या शहरातही करण्यास परवानगी दिली आहे. यामुळे बेस्ट आणि नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या बसगाड्या ठाण्यातून प्रवाशांची वाहतूक करीत आहेत. तर, ठाणे परिवहन उपक्रम मुंबई आणि नवी मुंबईत



प्रवासी वाहतूक करित आहे.

बेस्ट, ठाणे, नवी मुंबई परिवहन उपक्रमाच्या बसगाड्या दुसऱ्या शहरातून प्रवासी वाहतूक करित असल्यामुळे तेथील प्रवाशांना मोठा दिलासा मिळत असून त्याचबरोबर परिवहनच्या उत्पन्नाही वाढ होत आहे. ठाण्यात सर्वाधिक वाहतुकीचा मार्ग म्हणून ठाणे ते घोडबंदर हा ओळखला जातो. या मार्गावर बेस्ट, ठाणे, नवी मुंबई परिवहन उपक्रमाच्या बसगाड्या प्रवासी वाहतूक करतात. मात्र, गेल्या काही वर्षांपासून या मार्गावर खासगी बसगाड्यांची बेकायदा वाहतूक सुरू आहे. या बसगाड्या परिवहनच्या बस थांब्यांवर थांबून प्रवाशांची वाहतूक करीत आहेत. त्यावर कोणतीच कारवाई होत नसून या वाहतुकीमुळे बेस्ट, ठाणे, नवी मुंबई परिवहन उपक्रमाच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे.

ठाणे परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात ४७४ बसगाड्या उपलब्ध आहेत. यातही काही बसगाड्या ठेकेदारामार्फत चालविल्या जात आहेत. ठाणे महापालिकेला शनिवार-रविवार वगळता दररोज सुमारे २५ लाख उत्पन्न मिळते. तर शनिवार-रविवारी यादिवशी दररोज सुमारे १९ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. परंतु टिएमटी बसगाड्यांची वाहतूक ठरविलेल्या वेळापत्रकानुसार होत नाही. वाहतूक कोंडी तसेच इतर कारणांमुळे ही वाहतूक वेळेत होत नाही. अनेकदा प्रवाशांना सुमारे अर्धा तास विलंबाने बसगाड्या उपलब्ध होतात. या प्रवाशांना बेस्ट, नवी मुंबई महापालिका आणि मिरा भाईंदर महापालिकेच्या बसगाड्याही सुविधा उपलब्ध आहे. परंतु त्याही ठराविक वेळेत सोडण्यात येतात. त्याचाच फायदा घेऊन खासगी बसगाडी चालक परिवहन थांब्यांवरून प्रवासी पळविण्याचे काम करीत आहेत.

गेल्याकाही वर्षांत घोडबंदर भागात मोठ्याप्रमाणात नागरिकरण वाढले आहे. येथील नागरिक टिएमटी बसगाड्यांच्या वाहतुकीवर अवलंबून असतात. परंतु बसगाड्यांची संख्या तुलनेने कमी आहे. त्यामुळे घोडबंदर पट्ट्यात ठाणे ते कोपरी आणि सिडकोपर्यंत या खासगी बसगाड्या धावू लागल्या आहेत. हे बसगाडी चालक टिएमटीचे प्रवासी पळवित आहेत. या बसगाड्यांचे तिकीट दर कमी आहे. अवघ्या काही मिनीटांत या बसगाड्या उपलब्ध होत असल्याने प्रवासी धोकादायकरित्या या बसगाड्यांतून प्रवास करत आहेत.



## सुशासन सप्ताह अंतर्गत “प्रशासन गाव की ओर” अभियानाच्या यशस्वीततेसाठी जिल्ह्यातील कार्यालयप्रमुखांची बैठक संपन्न

ठाणे (यश सावंत):- केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधार विभागामार्फत सुशासन सप्ताह अंतर्गत “प्रशासन गाव की ओर” हे अभियान दि.१९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

हे अभियान जिल्ह्यामध्ये राबविण्याकरिता पूर्वतयारी करण्यासाठी जिल्ह्यातील कार्यालयप्रमुखांची बैठक काल दि.१६ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती. या अभियानाच्या कालावधीत आयोजित करावयाच्या उपक्रमांची माहिती या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, ठाणे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वाती शिंदे, भिवंडी सहाय्यक कामगार आयुक्त आनंद भोसले, ठाणे सहाय्यक कामगार आयुक्त अनिल कुटे, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी योगेश जंगले, उप कार्यकारी अभियंता जे.आर. सोनार, सरकारी कामगार अधिकारी दीपा भिसे हे उपस्थित होते.

## वैष्णो व्हिजन संस्थेच्या वतीने १९ डिसेंबर रोजी “पन्नाशीतील ग्रंथाली”या विशेष कार्यक्रमाचे आयोजन

ठाणे (विशाल पाटील) : मराठी साहित्य विश्वातील लोकप्रिय “ग्रंथाली”या संस्थेला दि. २५ डिसेंबर २०२४ रोजी पन्नास वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने वैष्णो व्हिजन संस्थेच्या वतीने गुरुवार दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजता मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे (प.) येथे “पन्नाशीतील ग्रंथाली”या विशेष गप्पा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष पंचागकर्ते, खगोलशास्त्र अभ्यासक श्री.दा.कृ. सोमण हे आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर संचालक श्री.सुहास मेहता हे असून विशेष निमंत्रित म्हणून मराठी भाषा विभाग संस्था, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे संचालक डॉ.शामकांत देवरे व ठाणे जिल्हा माहिती अधिकारी श्री.मनोज शिवाजी सानप हे उपस्थित राहणार आहेत.

या गप्पा कार्यक्रमात माजी राज्यसभा सदस्य तथा ज्येष्ठ पत्रकार, संपादक श्री.कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार, संपादक श्री.दिनकर गांगल, ग्रंथालीचे संपादक श्री.अरुण जोशी, ग्रंथाली संस्थेच्या विश्वस्त डॉ.लतिका भानुशाली व डॉ.मृण्मयी भजक यांचा यांचा सहभाग आहे. या कार्यक्रमात मुलाखतकार म्हणून जयु भाटकर हे असणार आहेत. तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अस्मिता पांडे करणार आहेत.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाण्यातील साहित्यिक अनंत देशमुख, अशोक बागवे, अनुपमा उजगरे, चांगदेव काळे आणि डॉ.निर्मोही फडके या साहित्यिकांचा सत्कारही करण्यात येणार आहे.

तरी, या कार्यक्रमासाठी रसिकांनी मराठी ग्रंथसंग्रहालय, पहिला मजला, वा.अ. रेगे सभागृह, स्टेशन रोड, ठाणे (प.) येथे दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन वैष्णो व्हिजन संस्थेच्या संस्थापक व कार्यकारी निर्माती पद्मा भाटकर यांनी केले आहे.

## घाटकोपर – डोंबिवली प्रवासात रिक्षेत विसरलेला बारा लाखांचा सोन्याचा ऐवज महिलेला परत

डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) : घाटकोपर ते डोंबिवली रिक्षेने प्रवास करत असताना येथील एका महिलेचा १२ लाख ९५ हजार रूपयांचा ऐवज असलेली पिशवी डोंबिवलीत उतरल्यावर रिक्षेत विसरली. ही माहिती महिलेने टिळकनगर पोलिसांना दिली. पोलिसांनी घाटकोपर ते डोंबिवली दरम्यानचे रस्त्यावरील सीसीटीव्ही चित्रण तपासून ऐरोली येथे संबंधित रिक्षा चालकाला शोधले. त्यांच्या रिक्षेतील १२ लाख ९५ हजाराची सोन्याची पिशवी ताब्यात घेऊन ती महिलेच्या स्वाधीन केली.



या प्रकरणातील तक्रारदार महिला भारती नागराज कर्केरा या मुळच्या कर्नाटक येथील उडपी शहरातील रहिवासी आहेत. त्या घाटकोपर येथे आपल्या नातेवाईकांकडे आल्या होत्या. तेथून त्या डोंबिवलीत येणार होत्या. गेल्या चार दिवसापूर्वी तक्रारदार महिलेला डोंबिवलीत यायचे होते. त्यांच्या जवळ सोन्याचा मणिहार, सोनसाखळी, बांगड्या, अंगठ्या, रिंगा असा एकूण १२ लाख ९५ हजाराचा ऐवज होता.


एवढा किमती ऐवज घेऊन लोकलने प्रवास करण्यापेक्षा सुरक्षित प्रवास म्हणून तक्रारदार महिलेने घाटकोपर ते डोंबिवली रिक्षेने प्रवास करण्याचा निर्णय घेतला. गेल्या शुक्रवारी त्या घाटकोपर मधील चिरागनगर येथून रिक्षेने डोंबिवलीत गोग्रासवाडी भागात आल्या. रिक्षेतून उतरल्यानंतर त्यांनी रिक्षेतील आपले सर्व सामान उतरून घेतले. त्यांची सोन्याचा ऐवज असलेली पिशवी रिक्षेत विसरली. घरी गेल्यानंतर तक्रारदार महिलेच्या हा प्रकार लक्षात आला. त्यांनी तातडीने टिळकनगर पोलीस ठाणे गाठले आणि घडला प्रकार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांना सांगितला.

पोलिसांचे एक पथक तातडीने तपासाला लागले. घाटकोपर ते डोंबिवली ज्या रस्त्याने रिक्षा आली. त्या रस्त्यावरील विविध भागातील सीसीटीव्ही चित्रण पोलिसांनी तपासले. या चित्रणातून पोलिसांनी रिक्षा चालकाचा वाहन क्रमांक आणि त्या आधारे त्या रिक्षा चालकाची ओळख पटवली. त्यानंतर त्याचा शोध सुरू केला. दिवसभराच्या शोधात पोलिसांनी भारती कर्केरा यांना डोंबिवलीत येथे सोडणारा रिक्षा चालक ऐरोली चिंचपाडा भागातून ताब्यात घेतला.

# विशेष मुलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी महापालिका पाठीशी उभी राहिल – आयुक्त सौरभ राव

### विशेष मुलांच्या कलाविष्काराने साजरा झाला जागतिक दिव्यांग दिन

ठाणे (यश सावंत) : व्यंगत्वावर मात करीत कलागुण



करण्यात आला, या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने आज (१७

दिव्यांग कला केंद्र ठाणे प्रस्तुत अरेरे ते अरेव्वा..” या विशेष

## लोक अदालतीतून २ हजार ७०१ ग्राहकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा

कल्याण (आकाश कांबळे) - तालुकास्तरावर १४ डिसेंबरला आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीतून कल्याण व भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित तसेच वीजचोरीची दाखलपूर्व व प्रलंबित अशी २ हजार ७०१ प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. महावितरणच्या उपलब्ध सवलतीचा लाभ घेत संबंधित ग्राहकांनी ६ कोटी २१ लाख रुपयांची भरणा केला.

# रश्मिका मंदानाने १३ वर्षांनी मोठ्या 'या' अभिनेत्याशी केलेला साखरपुडा



## ■ ब्रेकअपनंतर आता कसं आहे दोघांचं नातं?

दाक्षिणात्य चित्रपटांमधून आपल्या करिअरची सुरुवात करणारी रश्मिका मंदाना आता बॉलीवूडमधील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. 'पुष्पा द राइज', 'ॲनिमल' आता 'पुष्पा २ द रूल' अशा ब्लॉकबस्टर चित्रपटांची नायिका येत्या काळात सिनेसृष्टीतील सुपरस्टार्सबरोबर काम करताना दिसणार आहे. करिअरमध्ये यशाच्या शिखरावर असलेल्या रश्मिकाच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही बरीच चर्चा होत असते. ती तिचा 'गीता गोविंदम' व 'डिअर कॉम्रेड'मधील को-स्टार विजय देवरकोंडाला डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे. पण त्याआधी अभिनेत्रीने तिच्यापेक्षा १३ वर्षांनी मोठ्या एका अभिनेत्याशी साखरपुडा केला होता. 'पुष्पा २' च्या यशामुळे चर्चेत असलेल्या रश्मिकाने आठ वर्षांपूर्वी तिच्या पहिल्या चित्रपटातील सहकलाकार रक्षित शेट्टी याच्याशी साखरपुडा केला होता. रश्मिका मंदाना व रक्षित शेट्टी यांनी २०१६ मध्ये आलेल्या 'किरीक पार्टी' चित्रपटात एकत्र काम केलं होतं. शूटिंगदरम्यान दोघांमध्ये जवळीक वाढली आणि ते डेट करू लागले. काही काळाने त्यांनी साखरपुडा केला. मात्र, दोघांचं नातं फार टिकलं नाही.

### वर्षभरात मोडला साखरपुडा

काही काळ डेट केल्यानंतर रश्मिका व रक्षित यांनी ३ जुलै २०१७ रोजी एंगेजमेंट केली होती. त्यावेळी रश्मिका फक्त २१ वर्षांची होती, तर रक्षित ३४ वर्षांचा होता. दोघांच्या वयात १३ वर्षांचे अंतर होते. मात्र साखरपुड्यानंतर त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. वर्षभराने सप्टेंबर २०१८ मध्ये त्यांचा साखरपुडा मोडला व ते वेगळे झाले. या दोघांनीही साखरपुडा मोडण्याचं कारण कधीच सांगितलं नाही.

### रक्षित व रश्मिकाचं नातं कसं आहे?

रश्मिका व रक्षित यांचा साखरपुडा मोडला असला, तरी ते एकमेकांच्या संपर्कात आहेत. रक्षितने एकदा त्यांच्या बाँडबद्दल सांगितलं होतं. रक्षित म्हणाला होता की तो व रश्मिका एकमेकांच्या संपर्कात आहेत. दोघेही अधूनमधून मेसेज करतात. तसेच त्यांचा कोणताही चित्रपट प्रदर्शित झाला की ते एकमेकांना शुभेच्छा देतात.

### रक्षित शेट्टीचे चित्रपट

रक्षितने अनेक सुपरहिट चित्रपट केले आहेत. '७७७ चार्ली', 'सप्त सागरादाचे एलो – साइड ए', 'बॅचलर पार्टी', 'किरिक पार्टी', अवाने 'श्रीमन्नारायणा' हे त्याचे काही गाजलेले चित्रपट आहेत.

### रश्मिका मंदाना व विजय देवरकोंडाच्या डेटिंगच्या चर्चा

रश्मिका मंदाना सध्या तेलुगू अभिनेता विजय देवरकोंडाला डेट करत असल्याच्या चर्चा आहेत. दोघांचे बरेच फोटो व्हायरल होत असतात. रश्मिकाने दिवाळीत विजयच्या घरात फोटोशूट केलं होतं. तसेच 'पुष्पा २' चित्रपट तिने त्याच्या कुटुंबाबरोबर पाहिला होता. असं असलं तरी आतापर्यंत रश्मिका किंवा विजय यांनी त्यांच्या नात्याबद्दल जाहीरपणे वक्तव्य केलेलं नाही.

# "फिल्म इंडस्ट्री पूर्णपणे अनाथ झाली आहे", पंतप्रधान मोदी आणि कपूर कुटुंबाच्या भेटीवर कंगना रणौत यांचं वक्तव्य



काही दिवसांपूर्वी बॉलीवूडचं लोकप्रिय कपूर कुटुंबाने पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. याचं निमित्त होतं बॉलीवूडचे शोमॅन म्हणून ओळखले जाणारे राज कपूर यांची १००वी जयंती. यानिमित्ताने कपूर कुटुंबाने शताब्दी कार्यक्रम आयोजित केला होता. याचं आमंत्रण देण्यासाठी कपूर कुटुंबाने पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. यावेळी नीतू कपूर, रणबीर कपूर, करिश्मा कपूर,

कलाकारांना पंतप्रधान नरेंद्र मोदी सतत भेटताना दिसत आहेत. पण, काही दिवसांपूर्वी तुम्ही सांगितलं होतं, तुम्हाला पंतप्रधान मोदींना भेटण्यासाठी वेळ मिळत नाहीये. तर याबद्दल काय वाटतं?

कंगना रणौत म्हणाल्या, "मला वाटतं, आपल्या सिनेसृष्टीला मार्गदर्शनाची खूप गरज आहे. हे सॉफ्ट पॉवर आहे आणि याचा वापर कमी केला जात आहे. आज पंतप्रधान

लोक नेहमी असुरक्षित असतात आणि सहज कुठल्याही घटनेत फसतात; ज्यामुळे त्यांची प्रतिमा मलिन होते, यावर कंगना यांनी अधिक जोर दिला. त्या म्हणाल्या, "ते पैसे देतात आणि ते कुठेही काहीही करून घेतात. दाऊद त्यांना त्याच्या पार्ट्यांमध्ये घेऊन जातो, त्यामुळे अनेकदा ड्रग्जच्या जाळ्यात अडकतात. हे खूप असुरक्षित आहे. त्यांना जबाबदारी दिली आहे. त्यांना भेटण्याची परवानगी आहे. त्यांनाही वाटतं की, आम्ही पंतप्रधानांना भेटलं पाहिजे. ते आमचं काम बघतात. ते आमच्याबाबतीत विचार करतात. तिथे असं बोललं जात नाही. त्यांना वाटतं की, ते काहीही करू शकतात. मग ते गँगस्टरच्या पार्ट्यांमध्ये जाऊन नाचतात. त्यावेळी


# 'पुष्पा २ चा बॉक्स ऑफिसवर जलवा कायम! जगभरातील कमाई १४०० कोटींहून जास्त




अल्लू अर्जुन व रश्मिका मंदाना यांचा 'पुष्पा २' चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. 'पुष्पा २' लवकरच जगभरात १५०० कोटींचा टप्पा गाठणार आहे. चित्रपटाने १२ दिवसांत १४०० कोटी रुपयांहून जास्त व्यवसाय केला आहे. या चित्रपटाने अनेक चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले आहेत. रविवारच्या तुलनेत सोमवारी चित्रपटाच्या कमाईत घट झाली. सोमवारी १२ व्या दिवशी चित्रपटाने जगभरात ३० कोटी रुपयांचे कलेक्शन केले. ५ डिसेंबरला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कलेक्शन केले आहे. 'पुष्पा २' यंदाचा सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट ठरला आहे. 'पुष्पा २' इतर भाषांपेक्षा हिंदीत जास्त कमाई करत आहे. तेलुगूपेक्षाही सिनेमाची हिंदीतील कमाई अधिक आहे. सोमवारी, चित्रपटाने भारतात २७.७५ कोटी रुपयांची कमाई केली. यापैकी हिंदी भाषेतील कमाई २१ कोटी रुपये आहे. तर, तेलुगूमध्ये ५.४५ आणि तमिळमध्ये एक कोटी रुपये कमावले. सॅकनिल्कच्या वृत्तानुसार, पुष्पा २ चे भारतातील १२ दिवसांचे एकूण कलेक्शन ९२९.९५ कोटी रुपये आहे. यापैकी हिंदी भाषेत चित्रपटाने ५७३.१ कोटी रुपयांची कमाई केली, तर तेलुगू भाषेत १२ दिवसांत २८७.०७ कोटी रुपयांचे कलेक्शन केले. १२ दिवसांत 'पुष्पा २' ने आरआरआरच्या (१२३० कोटी रुपये) आणि यशच्या KGF: चॅप्टर २ (१२१५ कोटी रुपये) कलेक्शनला मागे टाकले आहे. सुकुमार दिग्दर्शित हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला आहे. तो एसएस राजामौलींच्या बाहुबली २चा रेकॉर्ड मोडण्याची शक्यता आहे. या चित्रपटाने जगभरात १७९० कोटी रुपये कमावले होते. भारतातील आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट 'दंगल' आहे. आमिर खानच्या सिनेमाने जगभरात २०७० कोटी रुपये कमावले होते. आता अल्लू अर्जुनचा सिनेमा 'बाहुबली २' व 'दंगल' चे रेकॉर्ड मोडतो का, ते पाहणं महत्त्वाचं ठरेल. सुकुमार दिग्दर्शित 'पुष्पा २' चित्रपटाची निर्मिती मैथ्री मूव्ही मेकर्सने केली आहे. अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदानासह मल्याळम अभिनेता फहाद फासिल या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत आहे. 'पुष्पा २' हा अल्लू अर्जुनच्या २०२१ मध्ये रिलीज झालेल्या 'पुष्पा: द राइज'चा सिक्वेल आहे.

# शिवानी सोनार लवकरच चढणार बोहल्यावर, लग्नात घालणार पणजीची नथ

'राजा राणीची गं जोडी' मालिकेतून घराघरात पोहोचलेली संजीवनी



गोष्ट आणि एखादा दागिना घडवतं असताना तो पाहणं याच्या सारखं

जास्त स्पेशल दागिना आहे हा... कारण अंकईकर आजोबांनी खूप

# महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**नागपूर (नितीन देवळेकर)** - राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या www.mahagosevaayog.org या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. विधानभवनातील समिती सभागृहात या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. राज्यामध्ये देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.




राज्यात १ कोटी ३९ लाख गोवंश असून त्यामध्ये १३ लाख देशी गायी असल्याची माहिती अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. 'गो टेन' अंतर्गत गो संगोपन, गो संवर्धन, गो संरक्षण, गोमय मूल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गो आधारीत शेती, गो साक्षरता आणि गो पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा (डेअरी) निर्माण करण्यात येतील, असेही श्री. मुंदडा यांनी सांगितले.

आयोगामार्फत देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण केले जात आहे. गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोवंश संस्थांची नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केन्द्र योजना व इतर योजना अंतर्भुत करणे व त्याची अंमलबजावणी करणे, पशुआरोग्य सेवांचे प्रचालन करणे, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती, पशुंची काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण आणि जनजागृती केली जात असून त्याबाबतची माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातून सार्वजनिक करण्यात आली आहे. सर्वसामान्य जनता आणि गोवंश संवर्धन करणाऱ्या संस्थांसाठी या संकेतस्थळाच्या माध्यमातून एका क्लिकवर माहिती उपलब्ध करून दिली आहे.

संकेतस्थळाच्या अनावरण प्रसंगी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गोसेवा आयोगाचे सदस्य सर्वश्री संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय, उद्धव नेरकर, सुनील सूर्यवंशी, सनत कुमार गुप्ता, दीपक भगत आदी उपस्थित होते.

# रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील येरवंडे ग्रामस्थ बिबट्याच्या दहशतीखाली

**रत्नागिरी (दिगंबर जाधव)** - रत्नागिरी तालुक्यातील येरवंडे हे गाव डोंगर माथ्यावर असून ग्रामस्थ सद्या घराच्या बाहेर पडण्यास घाबरत आहेत. मागील काही दिवसां पासून बिबट्याच्या मुक्त संचार या विभागात पाहायला मिळत आहे. काल १६ डिसेंबर संध्याकाळी ६ च्या दरम्यान येरवंडे गावाचे ग्रामस्थ राजा कोलगे यांची गाय गावातच बिबट्याने हल्ला करून हत्या केली आहे. अश्या घटना वारंवार घडत असून ग्रामस्थ भयग्रस्त झाले आहे. वनखाते मात्र यावर काही उपाय योजना करताना दिसत नाही माणूस मारल्यावर वन खाते जागे होणार का ? असा संतप्त सवाल गावकरी विचारात आहेत.



मागील महिन्यात बाजूच्या तळवडे गावात एका ग्रामस्थाची गाय बिबट्याने मारली तर दुसरी जखमी केली होती तर १० डिसेंबर रोजी गणपत शिंदे यांची गाय देखील येरवंडे गावात बिबट्याने मारली आणि आता ७ दिवसाच्या अंतराने तिसरी गाय मारली आहे यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान तर होता असून सर्व ग्रामस्थ बिबट्याच्या दहशतीखाली वावरत आहेत, या बाबत वनखात्याच्या अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता संपूर्ण तालुक्यात वन खात्याचे फक्त दोन जण कार्यरत असून बिबटयांचे प्रमाण वाढले आहे हे मान्य करतात तर वन खाते पंचनामा करून पुढील कारवाई करत आहे.

**SPORT**

# 'Not The Right Call': Cheteshwar Pujara On India's Decision To Pick Ravindra Jadeja At Gabba

**New Delhi -** Cheteshwar Pujara has raised questions over India's selection of all-rounder Ravindra Jadeja for the third Test of the 2024-25 Border Gavaskar Trophy, underway at the Gabba, Brisbane.

Jadeja replaced Ravichandran Ashwin from the playing eleven of the second Test in Adelaide. Ashwin got to bowl only in the first innings and took one wicket for 53 runs in his 18 overs. At the Gabba, Jadeja sent down 23 wicketless overs in the first innings, giving away 95 runs as Australia put on 445/10

Pujara feels India would have been better off with either Ashwin or Washington Sundar, considering the number of left-handed batters in the Australian team.

"I know he has been chosen as a batter who can bowl a bit. But, in Australian conditions, when you know that the strong opposition batters are left-handers



– Travis Head, Usman Khawaja, and Alex Carey all are left-handers. So, you want your off-spinner to be there. Even if you look at the rough, it's mainly for the right-handers," Pujara told ESPN Cricinfo on Monday.

"Off-spinners will come into play eventually, even in the second innings. It could have been Ashwin or Washington, but playing Jadeja was probably not the right call. He is one of the best players. He is a great batter and a great fielder, but probably to contain Aussies in those conditions, I thought it was a tough task for him," the veteran Indian batter explained further.

While the other Indian bowlers failed to influence the game, Jasprit Bumrah wrapped up the first innings with a six-wicket haul. The right-arm pacer delivered 28 overs and conceded 76 runs. Among others, Mohammed Siraj picked two scalps while Akash Deep and Nitish Kumar Reddy each got one.

# Novak Djokovic to pair for doubles with Nick Kyrgios at Brisbane International

**Wimbledon -** Nick Kyrgios has hinted at a potential doubles partnership with Novak Djokovic at the Brisbane International next year. Kyrgios, who is making his long-awaited return to competitive tennis, took to social media to share the news, posting: "Doubles at Brisbane. See y'all there," alongside a picture of himself



is not widely known for his double's participation, the 24-time Grand Slam champion sees this as an opportunity to fine-tune his game before attempting to claim his 11th Australian Open title. Djokovic has played only one doubles match in 2024, making this partnership with Kyrgios all the more intriguing for fans.

# Jasprit Bumrah turns Gabba batting hero, day after banter with reporter

**Gabba -** Jasprit Bumrah is a proud cricketer. When his batting skills were questioned, albeit in a light-hearted moment at a press conference, Bumrah reminded the world that he takes each aspect of his game seriously. A day after he faced an awkward situation after a cheeky question from a reporter at the Gabba, Bumrah played a potentially match-saving knock for India against Australia in the first innings of the third Test. Jasprit Bumrah was resolution personified in the middle during his gritty



his bat around bravely and added crucial runs to India's tally.

Bumrah was not fazed by anything that Australia threw at him. When Pat Cummins tried to target his helmet with a steep bouncer, Bumrah played a pull

# तस्करी रोखण्यासाठी वाळूच्या बेकायदा उपशावर ड्रोनची 'नजर'

● पुणे, अभिजित येरल्लू :



जिल्ह्यात नदी नाल्यांमधून बोटींमधून रात्री वाळूचा बेकायदा उपसा तसेच तस्करी रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता ड्रोनद्वारे नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी दोन ड्रोन जिल्हा प्रशासनाने उपलब्ध करून दिले असून मागणी आणि गरजेनुसार त्याचा वापर बारामती, इंदापूर, दौंड तसेच आंबेगाव, जुन्नर भागात केला जाणार आहे. त्यामुळे वाळूमाफियांना चाप बसणार आहे.

राज्य सरकारने सामान्यांना माफक दरात वाळू मिळावी यासाठी धोरण आखले आहे. त्यानुसार प्रतिब्रास सहाशे रुपये दराने वाळूची विक्री केली जात आहे. त्यासाठी जिल्ह्यात सुमारे २६ ठिकाणी ठेके देण्यात आले आहेत. तरीही वाळूचा बेकायदा उपसा सुरू असून त्याद्वारे वाळूची तस्करी केली जात आहे. दिवसा किंवा रात्री नदीतून बोटीद्वारे वाळूचा उपसा केला जातो. मात्र, उपसा केलेल्या वाळूचा साठा नदीकाठच्या झाडाझुडपांत लपविला जातो किंवा शेजारील शेतांमध्ये ठेवला जातो. तसेच तेथेच ट्रकही लपविले जातात. त्या जागेपर्यंत महसूल विभागातील तहसीलदारांसह अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांना पोहोचता येत नाही. त्यामुळे वाळूचोरी रोखता येत नाही. ही चोरी पकडण्यासाठी तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता ड्रोनचा वापर सुरू केला आहे. त्यासाठी दोन ड्रोन घेतले असून त्याद्वारे आता नदी नाल्यांवर नजर ठेवली जाणार आहे. दौंड, बारामती, इंदापूर, जुन्नर, आंबेगाव, शिरूर या भागातील नदी, नाल्यांमध्ये ड्रोनद्वारे पाहणी केली जाणार आहे. स्थानिक अधिकाऱ्यांकडून माहिती संकलित केली जाणार आहे. त्यामुळे चोरी करणाऱ्या माफियांना पकडणे शक्य होईल. त्याशिवाय अन्य ठिकाणी मुरूम, दगड आणि माती यांची होणारी चोरीदेखील पकडण्यास ड्रोनचा वापर केला जाणार आहे. त्याची अंमलबजावणी नुकतीच सुरू झाली आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाने एका कंपनीची नियुक्ती केली आहे. जिल्ह्यात नदी, नाले असलेल्या दौंड, बारामती, इंदापूर, जुन्नर, आंबेगाव भागात ड्रोनच्या माध्यमातून वाळू चोरट्यांवर नजर ठेवली जाणार आहे.

# रेरा घोटाळ्यात फसवणूक झालेल्या कल्याण-डोंबिवलीतील ग्राहकांना न्याय द्यावा

## भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांची विधान परिषदेत मागणी

● नागपूर, नितीन देवळेकर :



कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या हद्दीतील काही इमारतींमधील रेरा नोंदणी घोटाळ्यात सामान्य ग्राहकांची फसवणूक करण्यात आली. आता या इमारती जमीनदोस्त करण्यासाठी महापालिकेने नोटीस बजाविल्यानंतर रहिवाशी हवालदिल झाले आहेत. या रहिवाशांना महापालिकेने दिलासा देण्यासाठी निर्देश द्यावेत. तसेच संबंधित बिल्डरांविरोधात मोक्का कायद्यान्वये कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेत 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन'द्वारे केली. घरग्राहकांच्या संरक्षणासाठी असलेल्या रेरा कायद्यांतर्गतची नोंदणी व बिल्डरने कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर अनेक राष्ट्रीयीकृत व खासगी बँकांकडून मंजूर झालेल्या कर्जातून कल्याण-डोंबिवलीतील ५८ इमारतींमध्ये शेकडो रहिवाशांनी घरे घेतली असून, सहा हजार नागरिक राहत आहेत. कालांतराने रेरा कायद्याअंतर्गत मंजुरी मिळविण्यासाठी बिल्डरांनी महापालिकेकडे बनावट कागदपत्रे सादर केली असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर महापालिकेने संबंधित इमारती जमीनदोस्त करण्यासाठी कारवाई सुरू केली आहे. या प्रकारामुळे रहिवाशी हवालदिल झाले आहेत. या रहिवाशांची व्यथा आमदार निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेत मंगळवार, दि. १७ डिसेंबर रोजी मांडली. या प्रकरणाची राज्य सरकारने दखल घ्यावी. तसेच सामान्य ग्राहकांना दिलासा देण्यासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेला निर्देश द्यावेत. तसेच या प्रकरणी बिल्डरांवर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार डावखरे यांनी केली.

# मिरा रोड येथे पिसाळलेल्या श्वानाचा लहान मुलावर जीवघेणा हल्ला

● मिरा रोड, सुचिता सोनावणे :

मिरा रोड येथे एका पिसाळलेल्या श्वानाने लहान मुलावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. यात मुलाच्या डोक्याला आणि तोंडाला गंभीर इजा झाली असून खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दक्ष रावत(८) असे जखमी झालेल्या मुलाचे नाव आहे. मिरा रोडच्या पूनम सागर परिसरात सोमवारी रात्री नऊच्या सुमारास हा प्रकार घडला.हा मुलगा याच भागात राहत असून रात्री मित्रांसोबत खेळत होता.यावेळी एक भटका श्वान त्यामागे लागला. त्याने प्रतिकार करण्याच्या आतच भटक्या श्वानाने त्याच्या तोंडावर आणि डोक्यावर चावे घेतले.



## दिवसाला सरासरी ४० जणांना श्वान दंश

मिरा भाईंदर शहरात भटक्या श्वानाचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शहरात जवळपास ३० हजार भटके श्वान असून ते टोळीने नागरिकांवर हल्ला करत आहेत. जानेवारी महिन्यापासून आता पर्यंत जवळपास १२ हजाराहून अधिक जणांना श्वानदंश झाल्याची नोंद झाली आहे. त्यानुसार शहरात दर दिवसाला ४० जणांना श्वानदंश होत असून पालिका प्रशासनाच्या उपायोजना कागदावरच असल्याचे आरोप होत आहेत.

# विधानभवनावर निघालेल्या दिव्यांगांच्या मोर्चात तणाव, धक्काबुक्कीचा आरोप

● नागपूर, सचिन कदम :



विधिमंडळाच्या पहिल्याच दिवशी विविध मागण्यांसाठी दिव्यांगांनी विधानभवनावर मोर्चा काढला. हा मोर्चा पोलिसांनी टेकडी मार्गावर अडविला. परंतु मोर्चात सहभागी काही दिव्यांग बांधव पोलिसांना चकमा देऊन विधानभवनाकडे निघाले होते. तर टेकडी मार्गावर इतर दिव्यांगांना अडविताना एका पोलिसाने मोर्चातील महिलेशी धक्काबुक्की केल्याचा आरोप करून दिव्यांग बांधवांनी रोष व्यक्त करून टेकडी मार्गावरील दुसऱ्या बाजूची वाहतूक रोखून धरली. संबंधित पोलिस माफी मागेपर्यंत दिव्यांग बांधव शांत बसणार नाहीत, असा पवित्रा घेतला, रात्री उशिरापर्यंत दिव्यांग बांधव मोर्चास्थळी ठिय्या मांडून बसले होते.

दिव्यांग बांधवांच्या विविध मागण्यांसाठी विदर्भ विकलांग संघर्ष समितीच्यावतीने हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी यशवंत स्टेडियम येथून मोर्चा काढण्यात आला. पोलिसांनी टेकडी मार्गावर हा मोर्चा अडविला. मोर्चात सहभागी विदर्भ विकलांग संघर्ष समितीचे अध्यक्ष गिरीधर भजभुजे, आशिष आमदरे, इरफान खान, राजन सिंग, मनोज राऊळ, उमेश गणवीर, नरेंद्र सौनडवले, रमेश ठाकरे, रोशन वंजारी, स्वी सुरस्कर, राजू राऊत, सुखदेव दुधलकर, राजेश खारेकर, देविदास मेश्राम, उषा लांबट, ज्योती बोरकर, उज्ज्वला खराबे यांनी दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांसाठी जोरदार नारेबाजी करीत कठडे तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांना रोखून धरले. दिव्यांग बांधवांना रोखताना एका पोलिसाचा मोर्चातील महिलेला धक्का लागला. मात्र, संबंधित पोलिसाने जाणूनबुजून धक्काबुक्की केल्याचा आरोप करीत दिव्यांग बांधवांनी टेकडी मार्गावरील दुसऱ्या बाजूची वाहतूक रोखून धरली. संबंधित पोलिस माफी मागेपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही, असा पवित्रा दिव्यांग बांधवांनी घेतला. यावेळी पोलिस उपायुक्त शशिकांत सातव, उपपोलिस अधीक्षक अतुल सबनीस, सहायक पोलिस आयुक्त नरेंद्र हिवरे, पोलिस उपायुक्त राहूल मदने, धंतोलीच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनामिका मिर्झापुरे यांच्यासह पोलिसांनी दिव्यांग बांधवांची समजूत घालून त्यांना विधानभवनाकडे जाण्यापासून रोखले. रात्री उशिरापर्यंत दिव्यांग बांधव आपल्या मागण्यांसाठी ठाण मांडून बसले होते.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सूवर्णसंधी

● ठाणे, रोहित जैसवाल :

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी

जानेवारी २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्रमांक ६० आयोजित करण्यात येत आहे, कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना

मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील

आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येताना सोबत घेवून यावेत:-

(अ) कंबाइंड डिफेन्स

झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी.

(क) टेक्निकल ग्रॅज्युएट

